पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

.....
.....

दिनांक :— ०७/०६/२०२५

मोटार सायकल चोर वाशिम स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात तिन गुन्हे उघड

वाशिम पोलीस घटकामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे यांनी गुन्हयांना प्रतिबंध होईल याकरीता विशेष प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. विशेष माहिमा राबवुन रेकॉर्डवरील व माहितगार गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहया करण्यात आल्या. उघडकीस न आलेल्या गुन्हयांना उघडकीस आणण्यावर भर देवुन गुन्हे उघडकीस आणण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेला सुचना/आदेश दिले.

त्यानुसार मोटार सायकली चोरी करणारा सराईत गुन्हेगार शिवाजी रामदास राठोड, रा. डोंगर खंडाळा, ता.जि. बुलढाणा याचेकडे चोरीच्या मोटार सायकली असुन तो वाशिम येथील काटा कोंडाळा चौकात मोटार सायकली विक्री करीता ग्राहक शोधत आहे. अशी दि.०६.०६.२०२५ रोजी मिळालेल्या गोपणीय माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन आरोपी शिवाजी रामदास राठोड यास त्याचेकडे असलेल्या हिरो कंपणीची मोटार सायकल एच. एफ.डिलक्स क्र. एम.एच.३८ एन ३२७६ सह ताब्यात घेतले. आरोपीला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने हिंगोली येथुन ०२ व मेहकर येथुन ०१ अशा मोटार सायकली चोरी केल्या असल्याची कबुली दिल्याने तिन गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडुन ०३ मोटार सायकली ताब्यात घेवुन पुढील तपासाकरीता मुद्देमालासह ठाणेदार पोलीस स्टेशन हिंगोली शहर, जि. हिंगोली यांचे ताब्यात दिले आहे.

सदर कारवाई मा. श्री अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, मा. श्रीमती लता फड, अपर पोलीस अधिक्षक, मा. श्री नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात पोनि स्थागुशा श्री रामकृष्ण महल्ले, सपोनि योगेश धोत्रे, पोलीस अंमलदार विनोद सुर्वे, गजानन अवगळे, गजानन झगरे, ज्ञानदेव म्हात्रे, अमोल इरतकर, गोपाल चौधरी, संतोष वाघ, यांनी सतत परिश्रम घेवुन गोपनिय माहिती मिळवुन केलेल्या तांत्रीक तपासामुळेच गुन्हे उघडकीस आले आहेत, याबाबत वरीष्ठ पातळीवर सुध्दा दखल घेण्यात आली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.